(CNR No. MHSN110001952020)

**नियमित दिवाणी दावा क्र.५२/२०२०**

**निशाणी ४४ सोबत**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा पुढील सरतपास वकील श्री.व्ही.बी.पाटील यांचेमार्फत शपथेवर सुरु</u>**

१०. माझे नाव पुनम बिरुदेव गरदाडे असून माझ्या सरतपासावर माझी सही आहे. त्यातील संपूर्ण मजकूर खरा व बरोबर आहे. दावा मिळकत माझ्या खरेदी मालकीची मिळकत आहे. सदरची मिळकत मी रुक्मिणी तुकाराम गरदाडे यांचेकडून खरेदी घेतलेली आहे. आता मला दिनांक २४/०५/२०१० रोजीचा दस्त क्र.८४७/२०१० दाखविण्यात आला. त्यावर रुक्मिणी गरदाडे यांचा खरेदी देणार म्हणून अंगठा आहे. तसेच खरेदी घेणार म्हणून माझी सही आहे. तसेच साक्षीदार म्हणून ज्ञानेश्वर तुकाराम गरदाडे, शंकर तुकाराम गरदाडे व अन्य दोन साक्षीदार यांच्या सह्या आहेत. सदर दस्तातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर दस्तास **<u>निशाणी क्र.४८</u>** देण्यात येत आहे. प्रतिवादी क्र.२, ३ यांच्यामधील व आमच्यामधील वाद सध्या मिटलेला आहे. पूर्वहक्कदार यांची काही तक्रार राहिलेली नाही.

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा उलटतपास प्रतिवादी क्र.२ व ३ तर्फे वकील श्री.सी.व्ही.जाधव यांचेमार्फत सुरु</u>**

११. माझे शिक्षण नववी पर्यंत झालेले आहे. मला लिहिता वाचता येते. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीचे एकूण क्षेत्र २१ हेक्टर ८६ आर आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामधील ४ आणेचा हिस्सा ज्ञानेश्वर, शंकर व

पूर्वहक्कदार रुक्मिणी यांचा होता. हे म्हणणे खरे आहे की, ज्ञानेश्वर, शंकर व रुक्मिणी यांनी त्यांचे ४ आणे हिश्यापैकी २ आणे पावणे ५ पै चा हिस्सा म्हणजे क्षेत्र ३ हेक्टर ३३.१७ आर अशी मिळकत प्रतिवादी क्र.२ व ३ यांना दिनांक ०३/०३/२००६ रोजी दस्त क्र.२६७/२००६ नुसार खरेदी दिलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, वादाबाबतचे सर्वात पहिले खरेदीपत्र हे दिनांक ०३/०३/२००६ रोजीचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीपत्राची नोंद दावा मिळकतीचे ७/१२ सदरी झालेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीपत्राची नोंद केवळ महसूल अधिका–यांच्या नजरचुकीमुळे राहिलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीपत्राची नोंद ७/१२ सदरी झालेली नसल्यामुळे ज्ञानेश्वर, शंकर व रुक्मिणी यांची नोंद ७/१२ सदरी ४ आणे अशीच राहिलेली होती.

१२. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.२ हा अशिक्षीत व अडाणी आहे. हे म्हणणे खरे आहे की, ३ हेक्टर ३३.१७ आर क्षेत्रात खरेदीपत्रापासून प्रतिवादी क्र.२ व ३ यांची कब्जेवहिवाट होती. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.२ व ३ यांचे खरेदीपत्राची नोंद आरटीएस तक्रार रजिस्टर चालवून ७/१२ सदरी झाली.

१३. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पतीने या न्यायालयात दाखल केलेल्या फौजदारी केसमध्ये आमच्या व प्रतिवादी क्र.२ व ३ यांचेमध्ये तडजोड झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर तडजोडीनुसार आम्हाला २ हेक्टर २३ आर (५ एकर २३ आर) क्षेत्र मला दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर तडजोडीनुसार प्रतिवादी क्र.२ व ३ यांना ३ हेक्टर ३३.१७ आर अशी त्यांची खरेदीची मिळकती त्यांना देण्यात आलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, ३ हेक्टर ३३.१७ आर या प्रतिवादी क्र.२ व ३ यांच्या मिळकतीशी आमचा

काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे आहे की, २ हेक्टर २३ आर क्षेत्राच्या आमच्या नावाच्या नोंदीला प्रतिवादी क्र.२ व ३ यांची काहीही हरकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीमध्ये २ हेक्टर २३ आर क्षेत्रात आमची व ३ हेक्टर ३३.१७ आर क्षेत्रात प्रतिवादी क्र.२ व ३ यांची वहिवाट आहे. हे म्हणणे खरे आहे की, फौजदारी केसमध्ये झालेल्या तडजोडीमध्ये प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी आम्हाला कोणताही अडथळा आणलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, ३ हेक्टर ३३.१७ आर क्षेत्राचे प्रतिवादी क्र.२ व ३ हे मालक व वहिवाटदार आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदर तडजोडीनुसार प्रतिवादी क्र.४ व ५ यांना दावा मिळकतीमध्ये कोणताही हिस्सा दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत गट नं.२४२ मधील ४ आणे हिश्याबाबत केवळ माझा व प्रतिवादी क्र.२ व ३ यांचा संबंध आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.२ व ३ यांच्या ३ हेक्टर ३३.१७ आर क्षेत्राला आम्ही कधीही हरकत अडथळा केलेला नाही व आमच्या २ हेक्टर २३ आर क्षेत्राला प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी हरकत अडथळा केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, तडजोडीप्रमाणे प्रतिवादी क्र.१ व त्यांचे वारस हे सहीला आलेले नाहीत त्यामुळे सदरचा दावा दाखल करणे भाग पडले आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**वादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा उलटतपास प्रतिवादी क्र.४ व ५ तर्फे वकील सौ.एल.आर.माळी यांचेमार्फत सुरु**

१४. हे म्हणणे खरे आहे की, फौजदारी केसमध्ये तडजोड झालेली असल्यामुळे प्रतिवादी क्र.४ व ५ यांनी दावा मिळकतीतील त्यांचा हक्क माझ्या लाभात सोडलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे प्रतिवादी क्र.४, ५ व माझ्यामध्ये कोणताही वाद राहिलेला नाही.

(CNR No. MHSN110001952020)

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

**<u>प्रतिवादी क्र.१अ, १ब, १क, १ड, १इ यांचेविरुध्द दावा एकतर्फा चालू असल्याने त्यांचेमार्फत उलटतपास नाही.</u>**

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

ASHWINI JOTIRAM BACHULKAR

Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2025.11.03 16:31:29 +0530

आटपाडी.

दिनांक : ०३/११/२०२५

(अ. जो. बाचुळकर)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
आटपाडी

*****